पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

दिनांक – **१३/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१३/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सभाध्यक्ष
२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
३. मा.गोफणे अनुराधा देविदास
४. मा.अपर्णा निलेश डोके
५. मा.अश्विनी विक्रम वाघमारे
६. मा.कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.शैलेश मोरे

सभा कामकाज चालू करतेवेळी सभागृहात मा.सभापती उपस्थित नसलेने मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारावे.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र.१) व्यवसायीक संघ स्थापन करणेबाबत - मा.कुंदन गायकवाड , मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २२/०६/२०१८ व २५/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १३/०७/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२५/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – कु.नुपूर लक्ष्मण मोरे, निगडी ,पुणे -४४ यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १३/०७/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अपर्णा डोके अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२६/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – सौ.रुपाली गणेश तरवडे यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १३/०७/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/१७५/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि. २९ ते ३१ जुलै २०१८ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१८-१९ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट ) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/- (अक्षरी र.रु.तिन लाख ब्यांऐंशी हजार नऊशे साठ फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणे सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

------------

ठराव क्रमांक – २०   विषय क्रमांक – ०४
दिनांक – १३/०७/२०१८   विभाग - क्रीडा
सुचक – मा.अपर्णा डोके   अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२२७/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर,पंच मानधन,पंच चहा अल्पोपहार खर्च,नारळ,पूजा खर्च,सत्कारार्थ पुस्तके खरेदी, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा उपस्थित क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक, पाहुणे यांचा चहापान-अल्पोपहार खर्च, पाहुणे सत्कारार्थ बुके खरेदी, साहित्य भाडेपोटी खर्च,नाट्यगृह भाडे इतर खर्च इ.,सन २०१८-१९ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे १५० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर ७५,राष्ट्रीय पातळीवर २५ शालेय खेळाडू,त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च,दैनिक भत्ता,प्रवेश फी, औषध खर्च इ.अदा करणे कामी अंदाजे र.रु.५०,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.२५,२५,१००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख पंचवीस हजार शंभर फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी-वार्षिक स्पर्धा क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य या २ लेखाशिर्षावर केलेल्या अनुक्रमे प्रत्येकी र.रु.२०,००,०००/- प्रमाणे एकूण तरतूद र.रु. ४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने मंडप,बैठक व्यवस्था,मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे.त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

-------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **कांबळे अंबरनाथ चंद्रकांत** )
**सभाध्यक्ष**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४४५/२०१८
दिनांक : १३/०७/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.